**<u>अर्जदाराचे साक्षीदार हजर : सामनेवाला क्र. 1 व त्यांच्या वकिलांना पुकारले असता गैरहजर आहेत. तसेच, सामनेवाला क्र. 2 यांचे वकील हजर आहेत. त्यामुळे सामनेवाला क्र. 1 चा उलटतपास तहकूब ठेवून सामनेवाला क्र. 2 यांच्यातर्फे श्री. एम. आर. देशमुख वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :</u>**

1. मयत महेश कोळी हे माझे लहान भाऊ होते. ते माझे पेक्षा एक वर्षाने लहान होते. त्यांचे लग्न झालेले नव्हते. माझे लग्न झालेले नाही. महेश व्यतिरिक्त मला दोन बहिंणी आहेत. माझे दोन्ही बहिंणी अर्जामध्ये पक्षकार म्हणून समाविष्ट नाहीत. त्यांचे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुरूवातीला माझे आईने अर्ज दाखल केला होता त्यावेळेस मी अर्जात पक्षकार नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मला आईने अर्ज दाखल केल्याची कल्पना होती. हे म्हणणे खरे आहे की, अर्ज दाखल केल्यानंतर दोन वर्षांनी मी अर्जात माझे नाव समाविष्ट करण्यासाठी अर्ज केला. मी व माझी आई एकत्र राहतो. माझी आई कॅन्सर पेशंट असल्यामुळे तिचे शपथपत्र दाखल केलेले नाही. माझे आईचे कॅन्सरचा उपचार 21 सेंच्युरी वापी येथे उपचार चालू आहे. त्यांना आजही औषधोपचार चालू आहेत.

2. हे म्हणणे खरे आहे की, सन 2023 पासून ते 23/08/2025 पर्यंत मी प्रकरणामध्ये शपथपत्र दाखल केलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सन 2023 ते 23/08/2025 पर्यंत शपथपत्र का दाखल केले नाही त्याचे कारण शपथपत्रात नमूद केलेले नाही. मनिष अग्रवाल यांनी दाखल केलेल्या अर्जाचे काय झाले ते मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मयत महेश कोळी हे व्यवसायाने व्यापारी होते. माझी पोलिसांनी दाखल केलेल्या कागदपत्राबाबत कोणतीही तक्रार नाही. घटनेबाबत तपास करण्यासाठी पोलीस माझेकडे आले नाही व मी देखील पोलीसांकडे गेलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी घटनेसंदर्भात घटना स्थळावर उपस्थीत असणा–या व इतर लोकांकडे घटनेबाबत चौकशी केली. पोलिसांनी इतर व्यक्तींचे जबाब नोंदविलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस तपासामध्ये देखील माझे भाऊ व्यापारी होते असे निष्पन्न झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सादर केलेल्या कागदपत्रामध्ये माझे भाऊ महेश कोळी यांचा वाहन चालविण्याचा परवाना दाखल केलेला नाही. हे मला माहिती नाही की, माझे भावाकडे वाहन चालविण्याचा परवाना होता किंवा नाही.

हे म्हणणे खरे आहे कीं, पालघरला राहात असलेले घर हे माझे स्वतःचे आहे. माझेमध्ये व केवल कृष्ण अग्रवाल यांच्यामध्ये काहीही नाते नाहीं. हे मला माहिती नाहीं कीं, माझे घर ते केवल कृष्ण अग्रवाल यांच्या घरामध्ये किती अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे कीं, केवल कृष्ण अग्रवाल हे पालघरमध्ये राहतात. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं व केवल कृष्ण अग्रवाल एकाच समाजाचे आहोत. हे म्हणणे खरे नाहीं कीं, माझे भाऊ व केवल कृष्ण अग्रवाल यांच्यामध्ये कोणतेहीं मालक व नोकर असे नाते नव्हते. हे म्हणणे खरे नाहीं कीं, केवल कृष्ण अग्रवाल, मनिष अग्रवाल व माझे भाऊ हे एकत्रीतपणे व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे आहे कीं, केवल कृष्ण अग्रवाल यांनीं माझे भावाला कामावर ठेवले होते हे दर्शविणारा दस्त ऐवज दाखल केलेला नाहीं. हे म्हणणे खरे आहे कीं, केवल कृष्ण अग्रवाल यांनीं माझे भावाला कामाचा मोबदला दिला हे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, केवळ व्यावसायिक संबंधातून घटना घडली असे असताना केवळ नुकसान भरपाई मिळवण्यासाठी मीं व केवल कृष्ण अग्रवाल यांनीं मिळून संगनमताने खोटा अर्ज दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नाहीं कीं, माझे भावाचा मृत्यू नोकर व मालक संबंध असताना झालेला नाहीं त्यामुळे विमा कंपनीं नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाहीं. हे म्हणणे खरे नाहीं कीं, मीं खोटे शपथपत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**सामनेवाला क्र. 1 च्या उलटतपासाकरिता पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.01.19 14:52:01 +0530

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–17/01/2026